नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

नागपूर सुधार प्रन्यास सांस्कृतिक संकुल, तिसरा माळा, नासुप्र जलतरण तलावासमोर, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर–४४० ०३३.

क्रमांक : का.अभि.(नामप्रविप्रा)/ ३५५ नागपूर, दिनांक : ४ /०५/२०१७.

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
नागपूर.

विषय :– मौजा गोधनी (रेल्वे), खसरा क्रमांक ३०, ३१, प.ह.नं. १२., तह. नागपूर (ग्रामिण), जि. नागपूर आराजी ०.२७. हे.आर (२७००.०० चौ.मी.) जागा निवासी वापरास अकृषक परवानगी मिळण्याबाबत.

संदर्भ :– अर्जदाराचा दिनांक १६/०६/२०१६ रोजीचा अर्ज.

महोदय,

विषयांकित प्रकरणातील जागा **निवासी वापरार्थ** अकृषक करणेप्रकरणी अभिन्यास मंजूरीचे प्रकरण संदर्भांकित अर्जान्वये प्राप्त झाले आहे.

अंतिम प्रादेशिक योजना नागपूर प्रदेशच्या प्रावधानानुसार उक्त जागा उत्तर प्रभाग क्षेत्रात स्थित असून **'निवासी'** या उपयोगाने प्रस्तावित आहे. तसेच नागपूर महानगर क्षेत्राकरिता दिनांक २०/०२/२०१५ ला प्रसिध्द झालेल्या प्रारूप विकास योजनेत उक्त जागा **निवासी–२** या उपयोगाने प्रस्तावित आहे आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३० (१) अन्वये दि. २४/०८/२०१६ रोजी मंजूरीकरीता शासनास सादर केलेल्या प्रारूप विकास योजनेनूसार उक्त जमिन **निवासी–२** या उपयोगाकरीता प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

संदर्भाधिन पत्रासोबत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रकरणाच्या अभिन्यासाला **मा. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण** यांनी दिनांक **२५/०४/२०१७** रोजी **अंतिम मंजूरी** प्रदान केलेली आहे. उक्त जागेला फक्त **निवासी** वापराकरीता अकृषक करण्याकरीता खालील अटींवर शिफारस करण्यात येत आहे.

१. अभिन्यासातील भूखंडाचा उपयोग फक्त **"निवासी"** वापराकरिताच करण्यात यावा. तसेच भविष्यात भूखंडाचे विभाजन करण्यात येवू नये.
२. सभोवतालचे मंजूर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्यरितीने समन्वय साधणे आवश्यक आहे.
३. अभिन्यासाची जागेवरील प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासातील राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासातील जागेच्या एकूण क्षेत्रफळाच्या १० टक्के पेक्षा कमी असु नये.
४. "सार्वजनिक सोई व सुविधा" करिता प्रस्तावित केलेल्या भुखंडाचे क्षेत्रफळ एकूण क्षेत्रफळाच्या १० टक्के पेक्षा कमी असु नये.
५. अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास, भूखंड आखतांना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.
६. विषयांकित जमिनीतून विद्युत वाहिनी/दुरध्वनी वाहिनी जात असल्यास उक्त वाहिनी प्रस्तावाला बाधित होणार नाही अशा रितीने संबंधीत विभागाच्या अद्यावत नियमानुसार आवश्यक त्या सामासिक अंतरावर स्थानांतरीत करावी लागेल.
७. सदर रेखांकनामधील प्रस्तावित बांधकामास त्यावेळी प्रचलित असलेली विकास नियंत्रण नियमावली लागू राहील.

८. विषयांकित जागेलगत/जागेतून पाण्याचे स्त्रोत जात असल्यास संबंधित पाटबंधारे/जलसिंचन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

९. पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

१०. अभिन्यासातील रस्ते, मलवाहिका, पावसाळी पाण्याची नलिका, जल वाहिनी, स्ट्रीट लाईट इत्यादि योग्य प्रकारे विकसीत करून ती संबंधित ग्रामपंचायतीस नियमानुसार हस्तांतरीत करावे लागतील. जेव्हा पर्यन्त विकास कामे ग्रामपंचायतीस हस्तांतरित होत नाही तेव्हा पर्यन्त जमीन मालकाने देखभाल दुरूस्तीची कामे करावी लागेल.

११. जमीनीचे मालकी हक्काबाबत महसूल विभागाचे स्तरावर खात्री करून घेणे आवश्यक राहील.

१२. अभिन्यासातील सिवेज ट्रिटमेंट प्लॉन्ट तयार करण्याचे काम अभिन्यास धारकाला / विकास कर्त्याला स्वतखर्चाने बांधून त्याची निगा Maintenance राखण्याची जबाबदारी अभिन्यास धारक / विकासकावर राहील.

१३. अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.

१४. अभिन्यासात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा (Black & Grey Water) पुनर्वापर करण्यासाठी (बगीचा, लन्ड स्केपिंग, फिशींग, फिश पॉड, रस्ते सफाई, संडास व मुतारीत उपयोगासाठी व धुण्यासाठी) नासुप्रच्या विश्वस्त मंडळाच्या ठराव क्र. २७/१०९२ दिनांक ०७/०१/२०११ च्या प्रावधानांनुसार सांडपाणी व सांडपाण्याची प्रक्रीया करून विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.

१५. विषयांकित जागेवर बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकाम नकाशे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कडून मंजूर करून घ्यावे लागेल.

१६. अभिन्यासास अंतिम मंजुरी प्राप्त झाल्यावर नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोबत विकास करारनामा करणे बंधनकारक राहील.

१७. संयुक्त मलनिस्सारण सयंत्र आणि अनुषंगिक बाबीकरीता लागणारे शुल्काचे अंशदानाचा भरणा करावा लागेल

अभिन्यासाची दोन प्रत या कार्यालयामार्फत यासह पाठविण्यात येत आहेत. कृपया उक्त जागेची अकृषक करनिर्धारण प्राप्त झाल्यानंतर अकृषक आदेशाची प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी, ही विनंती.

सहपत्र : अभिन्यास नकाशा दोन प्रत
मौजा गोधनी (रेल्वे),, ख.क्र. ३०, ३१, तह. नागपूर (ग्रामिण)

कार्यकारी अभियंता
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

प्रतिलीपी :—

मे. दिव्या बिल्डर्स तर्फे श्री. सत्येन चंद्रशेखर दाढे व इतर, ४०२, दया चेंम्बर्स, अजनी चौक, वर्धा रोड, नागपूर—४४००१५.